10-06-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 6/9/2025 10:42 PM Page 1



ब्रेकवॉटर वॉल रखडल्यामुळे मच्छीमार संकटात पान ३ वर


आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com




इंग्लंड कसोटीपूर्वी भारतीय संघावर संकट पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, १० जून २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 278 | Verna, | facebook.com/dainikherald | Tuesday 10 June 2025 | Pages 4 | ₹ 4

# जिथे अपमान तिथेच माफी हवी ! : डॉ. कुट्टीकर

## आरोग्यमंत्र्यांविरोधात जीएमसीत संताप | डॉक्टरांचे आंदोलन : पुन्हा मुख्यमंत्र्यांची मध्यस्थी

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ९ : ज्या कॅज्युअल्टी विभागात माझा अपमान झाला, त्याच ठिकाणी येऊन मंत्री राणेंनी कॅमेऱ्यासमोर माफी मागावी. तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा स्पष्ट आणि थेट संदेश गोमेकॉचे आपत्कालीन विभाग प्रमुख डॉ. रुद्रेश कुट्टीकर यांनी दिला आहे. डॉक्टर संघटनांकडून यासाठी आरोग्यमंत्र्यांना २४ तासांचा अल्टीमेटम देण्यात आला आहे. जीएमसी मधील आपत्कालीन रुग्णसेवा सुरू ठेवण्यात आली असली तरी इतर सर्व सेवा आणि नियोजनबद्ध उपचार मात्र तात्पुरते थांबवण्यात आले आहेत. दरम्यान मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी डॉक्टर संघटनांची भेट घेत त्यांना संपावर जाऊ नका अशी विनंती केली आहे.**

आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांनी शनिवारी गोमेकॉत जात मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ रुद्रेश कुट्टीकर् यांच्या अर्वाच्च भाषेत सर्व कर्मचारी आणि कॅमेऱ्यासमोर केलेला जाहीर अपमानाचे प्रकरण चांगलेच तापले आहे. रविवारी रात्री एका वृत्तवाहिनीशी बोलताना आरोग्यमंत्री राणे यांनी डॉ. कुट्टीकर व त्यांच्या कुटुंबियांची माफी मागितली असली, तरी तो अपुरा आणि औपचारिक प्रयत्न असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. कुट्टीकर यांचा ठाम दावा आहे की, राणे यांनी ज्या ठिकाणी त्यांचा सार्वजनिक अपमान केला, त्याच जागी, कॅमेऱ्यासमोर, डॉक्टर समुदायासमोर माफी मागणे आवश्यक आहे.

या प्रकरणामुळे गोमेकॉमध्ये संतप्त लाट उसळली आहे. सोमवारी सकाळीच गोमेकॉमधील सर्व निवासी डॉक्टर, कन्सल्टंट, वैद्यकीय विद्यार्थी आणि गार्ड संघटनेचे सदस्य डीन डॉ. शिवानंद बांदेकर यांच्या कार्यालयासमोर निदर्शनासाठी उतरले. व्हीआयपी संस्कृती बंद करा!, आम्हाला न्याय हवा!, अशा घोषणा देत निदर्शक डॉक्टरांनी परिसर दणाणून सोडला. मी फक्त माझे कर्तव्य करत होतो आणि माझ्यावर सार्वजनिकरित्या केलेली टीका केवळ माझा नाही, तर संपूर्ण वैद्यकीय समुदायाचा अपमान आहे, असे गोमेकॉचे आपत्कालीन विभाग प्रमुख डॉ. रुद्रेश कुट्टीकर यांनी माध्यमांना सांगितले. डॉ. कुट्टीकर यांच्या मते, बी-१२ इंजेक्शन ही आपत्कालीन सेवा नव्हती, मी त्याबाबत नियमशीर प्रक्रिया सांगत होतो. पण त्यावरून सार्वजनिक अपमान सहन करावा लागला. गोमेकॉचे डीन डॉ. बांदेकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, आपत्कालीन विभागासाठी कडक एसओपी लागू केली जाणार आहे. यापुढे अनावश्यक गर्दीला परवानगी नाही आणि व्हिडिओ रेकॉर्डिंग पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे. पोलिस बंदोबस्तही ठेवला जाईल. त्यांनी सांगितले की, व्हिडिओग्राफी करणाऱ्यावर एफआयआर दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आरोग्यमंत्री राणे यांनी रविवारी रात्री सोशल मीडियावरून जाहीर माफी मागितली होती. मी डॉक्टरांचा अपमान करण्याचा हेतू नव्हता. माझे शब्द आणि शैली चुकली. डॉक्टरांच्या सेवेचा मी आदर करतो, असे ते म्हणाले.

पान २ ▶






### आंदोलक डॉक्टरांच्या प्रमुख मागण्या

**-आरोग्यमंत्री यांनी आपत्कालीन विभागात प्रत्यक्ष येऊन, कॅमेऱ्यासमोर जाहीर माफी मागावी.**
**-व्हिडिओग्राफी करणाऱ्यावर तात्काळ एफआयआर दाखल करावा.**
**-गोमेकॉतील 'व्हीआयपी संस्कृती' तातडीने बंद करावी. शनिवारी झालेल्या घटनेची नि:पक्ष चौकशी व्हावी.**

### मुख्यमंत्र्यांची पुन्हा मध्यस्थी

**मंत्री राणेंच्या विरोधात जीएमसी मधील डॉक्टरांनी घेतलेल्या आक्रमक पवित्र्यामुळे आरोग्यसेवा कोलमडण्याचा धोका लक्षात येताच मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी डॉक्टर संघटनांची सोमवारी संध्याकाळी भेट घेतली.मुख्यमंत्र्यांनी स्वत: याबाबत माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार या घटनेनंतर डॉक्टरांनी आपल्या जवळपास १० मागण्या मुख्यमंत्र्यांसमोर ठेवल्या. यातल्या बहुतेक मागण्या आपण मान्य केल्याचे त्यांनी सांगितले. मंत्री राणे यांनी खाजगी वाहिनीच्या मुलाखतीत माफी मागितली असली तरी ती कॅमेऱ्यासमोर मागितली असल्याने ती ग्राह्य धरण्यात यावी अंशी विनंती आपण आंदोलक डॉक्टरांना केल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. यापुढे असे प्रकार होणार नाहीत अशी ग्वाहीही आपण सरकरच्या वतीने डॉक्टरांना दिल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. आपल्या आवाहनाचा मान ठेवून डॉक्टर संपावर जाणार नाहीत असा आपल्याला विश्वास असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.**

---

## निवडक

### मातृभाषांचा सन्मान, मोदींचा संकल्प!

**नवी दिल्ली, दि. ९ :** भाषा ही फक्त संवादाचे साधन नाही, तर आपली संस्कृती, आपले अस्तित्व आहे. स्वातंत्र्यानंतर आपल्या मातृभाषांची उपेक्षा झाली. पंडित नेहरू यांनी मातृभाषांकडे दुर्लक्ष केले, मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या ११ वर्षांत भारतीय भाषांना नवे जीवन दिले. ११ भाषांना शास्त्रीय दर्जा, संस्कृतसाठी १,०७४ कोटींची गुंतवणूक आणि बोलीभाषांचा सन्मान केलाय. तर चला, जाणून घेऊया पंतप्रधान मोदींच्या या प्रेरक संकल्पाची कहाणी.
स्वातंत्र्यानंतर १९५२ च्या जनगणनेत पंडित नेहरू यांच्या सरकारने भारतीय भाषांकडे दुर्लक्ष केले. इंदिरा गांधींच्या काळात तर १९७१ नंतर १०,००० पेक्षा कमी बोलणाऱ्या भाषांना 'इतर' म्हणून हिणवले गेले. भाषांवरच अन्याय केला गेला. त्यामुळे बोलीभाषा, मातृभाषा उपेक्षित राहिल्या. मात्र २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सत्ता आणि भाषांबाबतचं चित्रच बदललं. त्यांनी इंग्रजी भाषेइतकाच हिंदी, संस्कृत, पंजाबी, मराठी, बंगाली, तमिळ, तेलुगू, कन्नड, उडिया भाषांना मान – सन्मान दिला. पंतप्रधान मोदींनी २०२२ मध्ये मन की बातमध्ये मातृभाषेचं महत्त्व विषद केले.

---

### ट्रेनमधून १३ प्रवासी पडले, ४ जणांचा मृत्यू

**मुंबई, दि. ९ :** मुंबई उपनगरी रेल्वे सेवेच्या मध्य रेल्वे मार्गावर सोमवारी सकाळी भीषण अपघात झाला. अप आणि डाऊन फास्ट मार्गावरील दोन लोकल ट्रेन्स आजुबाजूच्या रेल्वे ट्रॅकवरुन जात असताना बाहेर लटकलेल्या प्रवाशांचा एकमेकांना धक्का लागून अनेक प्रवासी चालत्या ट्रेनमधून खाली ट्रॅकवर पडले. ट्रेनचा वेग जास्त असल्यामुळे हे प्रवासी गंभीररित्या जखमी झाले. आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार, या दुर्घटनेत ४ प्रवाशांचा मृत्यू झाला असून ९ जण जखमी झाले आहेत. जखमींना कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात आणि सिव्हिल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दोन रुग्णांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना काहीवेळापूर्वी ठाण्यातील ज्युपिटर रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

---

### लॉस एंजेलिसच्या रस्त्यांवर जाळपोळ

**लॉस एंजेलिस, दि. ९ :** अमेरिकेच्ऐया लॉस एंजेलिसमध्ऐये अवैध स्ऐथलांतरितांविरोधात मोहीम राबवत ४४ विदेशी नागरिकांना अटक केली. यानंतर स्ऐथलांतरित धोरणाविरुद्ध सलग दुस-ऐया दिवशी शहरात हिंसाचाराच्ऐया घटना घडल्ऐया. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शहरात दोन हजार राष्ट्रीय रक्षक तैनात करण्याच्या आदेशावर स्वाक्षरी केली. ट्रम्प यांनी शहरातील कायदा व सुव्ऐयवस्ऐथा कायम ठेवण्ऐयासाठी हा निर्णय घेतला आहे, असे व्हाईट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी कॅरोलिन लेविट यांनी स्ऐपष्ऐट केले. कॅलिफोर्नियाचे गव्हर्नर गॅव्हिन न्यूसम यांनी कॅलिफोर्निया राष्ट्रीय रक्षकाचा ताबा घेण्याच्या आणि लॉस एंजेलिसमध्ये २००० सैन्य तैनात करण्याच्या फेडरल सरकारच्या निर्णयाचा निषेध केला आहे. ट्रम्ऐप सरकारचा हा निर्णय तणाव आणखी भडकविणारा आहे.

---

### इस्रायलने ग्रेटा थनबर्ग यांचे जहाज घेतले ताब्यात

**गाझा, दि. ९ :** गाझाच्या नौदलाच्या नाकेबंदीचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न केल्यानंतर इस्रायली सैन्याने स्वीडिश हवामान कार्यकर्त्या ग्रेटा थनबर्ग आणि युरोपियन संसदेच्या फ्रेंच सदस्य (एमईपी) रिमा हसन यांच्यासह आंतरराष्ट्रीय कार्यकर्त्यांना घेऊन जाणाऱ्या मदत बोटीला इस्रायली सैन्याने अडवले. मॅडलीन नावाची ब्रिटीश ध्वज असलेली ही नौका पॅलेस्टिनी समर्थक फ्रीडम फ्लोटिला कोलिशनने आयोजित केलेल्या मोहिमेचा भाग होती. ही नौका ६ जून रोजी सिसिलीहून निघाली होती आणि आज उशिरापर्यंत गाझा पट्टीत पोहोचण्याचे लक्ष्य ठेवून इस्रायली सैन्याने त्यात प्रवेश केला होता, असे या गटाने टेलिग्रामवरील एका निवेदनात म्हटले आहे.

---


# कोकण रेल्वेचा पावसाळी आराखडा सक्रिय

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ९ :** कोकण रेल्वे मार्गावरील मुसळधार पावसामुळे होणाऱ्या संभाव्य अडथळ्यांना तोंड देण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य देण्यासाठी, कोकण रेल्वे प्रशासनाने १५ जून ते २० ऑक्टोबर या कालावधीत विशेष पावसाळी सुरक्षा योजना आणि सुधारित वेळापत्रक लागू करण्याची घोषणा केली आहे.

रेल्वे प्रशासनाच्या निवेदनानुसार, मुसळधार पावसामुळे दृश्यमानता कमी झाल्यास ट्रेनचा वेग मर्यादित ठेवण्यात येणार असून, लोको पायलटसना ४० किमी प्रतितास वेग राखण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. रेल्वे रुळांवर पाणी साचल्यास संबंधित मार्गावरील सेवा तत्काळ थांबवण्यात येणार असून, पाणी सुरक्षित पातळीपर्यंत उतरल्यावरच प्रवास पुन्हा सुरू केला जाईल.

पावसाळ्यापूर्वीची तयारी म्हणून, जलवाहिन्यांची साफसफाई व तपासणी पूर्ण करण्यात आली आहे.



▶ **१५ जूनपासून विशेष सुरक्षा उपायांची अंमलबजावणी**

भूस्खलनाच्या शक्यता असलेल्या ठिकाणांचे सर्वेक्षण करण्यात आले असून, अशा संवेदनशील भागांत ६३६ कर्मचारी विशेष गस्तीसाठी नेमण्यात आले आहेत. हे कर्मचारी संभाव्य धोके लवकर ओळखून त्यावर त्वरीत उपाययोजना करण्यासाठी सज्ज आहेत.

रणनीतिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणी उदा. रत्नागिरी, चिपळूण, वेर्णा आणि कणकवली येथे अपघात मदत वॅगन्स व उत्खनन यंत्रसामग्री सज्ज ठेवण्यात आली आहे, जेणेकरून आपत्कालीन स्थितीत तातडीने मदत पोहोचवता येईल. आपत्कालीन संवादासाठी लोको पायलट व गार्डना वॉकी-टॉकी आणि व्हीएचएफ सेट वितरित करण्यात आले असून, मार्गाच्या प्रत्येक किलोमीटरवर आपत्कालीन संपर्क सॉकेट्स बसवण्यात आले आहेत.

पावसाचे अचूक मोजमाप करण्यासाठी माणगाव, रत्नागिरी, मडगाव यांसह नऊ ठिकाणी स्व-रेकॉर्डिंग पर्जन्यमापक बसवले गेले आहेत. प्रमुख नद्यांवर पूर इशारा प्रणाली कार्यान्वित असून, वाऱ्याचा वेग मोजण्यासाठी ॲनिमोमीटर यंत्राद्वारे निरीक्षण सुरू आहे.

याशिवाय, बेलापूर, रत्नागिरी आणि मडगाव येथे २४-७ नियंत्रण कक्ष सक्रिय ठेवण्यात आले आहेत. चिपळूण, वेर्णा, मडगाव, कारवार आणि उडुपी स्थानकांवर वैद्यकीय पथके तैनात करण्यात आली आहेत, जे अपघात अथवा आणीबाणीच्या प्रसंगी तत्काळ प्रतिसाद देतील.कोकण रेल्वेने प्रवाशांना त्यांच्या अधिकृत वेबसाइटवर किंवा १३९ वर कॉल करून प्रवासपूर्व माहिती तपासण्याचे आवाहन केले आहे.

---

# धोकादायक इमारती पाडण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया आवश्यक

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ९ :** मडगावच्या मध्यवर्ती व वर्दळीच्या व्यावसायिक क्षेत्रात अर्धवट कोसळलेल्या दोन धोकादायक इमारती पाडण्यात येणार आहेत. मात्र आवश्यक कायदेशीर औपचारिकता पूर्ण झाल्यानंतरच ही कारवाई हाती घेण्यात येणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने स्पष्ट केले आहे.

सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून या इमारती हटवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, दक्षिण गोव्याचे जिल्हाधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला तातडीने पाडकामाची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिले होते. मात्र पीडब्ल्यूडीने स्पष्ट केले आहे की, संबंधित कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रियांचा अवलंब केल्यानंतरच प्रत्यक्ष कारवाई करता येईल. यासंदर्भात विभागाने जिल्हाधिकारी कार्यालयास आवश्यक वेळेचा आणि प्रक्रियेचा तपशील सादर केला आहे.



मडगावमधील जुन्या इमारतींच्या सुरक्षिततेबाबत दिवसेंदिवस चिंता वाढत आहे. मडगाव नगर परिषदेने आरंभी केलेल्या पाहणीत २१ इमारती धोकादायक ठरवण्यात आल्या होत्या. मात्र नंतरच्या पुनर्मूल्यांकनात त्यातील केवळ १० ते १२ इमारतींचे पाडकाम अत्यावश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, ही संपूर्ण मोहीम केवळ दोन इमारतींचे पाडकाम नव्हे, तर मडगाव शहरातील सार्वजनिक सुरक्षेला बळकटी देणाऱ्या एकंदर धोरणाचा भाग आहे. या पार्श्वभूमीवर, पीडब्ल्यूडीने यंत्रणा सज्ज ठेवली असून, पाडकामादरम्यान परिसरातील नागरिकांचे अडथळे कमी करण्यासाठी आवश्यक ती सर्व काळजी घेतली जाणार आहे.

मडगावमधील स्थानिक रहिवासी व व्यापाऱ्यांनी या निर्णयावर संमिश्र भावना व्यक्त केल्या आहेत. काहींनी भविष्यातील दुर्घटनांचा संभाव्य धोका टाळण्यासाठी सरकारच्या या पावलाचे स्वागत केले आहे. तर काही नागरिकांनी इमारती पाडल्यास व्यापार आणि वाहतुकीवर होणाऱ्या संभाव्य परिणामांबाबत चिंता व्यक्त केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे की, कोणत्याही कायदेशीर अडथळ्याला न सामोरे जाता ही प्रक्रिया पार पाडण्यासाठी सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्यात येईल. पाडकामाची तारीख निश्चित करण्यासाठी कायदेशीर मंजुरीची पूर्तता महत्त्वाची असल्याचेही अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे.

दरम्यान, प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की त्यांनी संबंधित क्षेत्रातील इमारतीभोवती सतर्क राहावे. कोणत्याही इमारतीत भेगा, झुकणे, पडझड यासारखी लक्षणे दिसल्यास तात्काळ स्थानिक अधिकाऱ्यांना माहिती द्यावी, जेणेकरून त्वरित उपाययोजना करता येईल.सद्य:स्थितीत, सार्वजनिक बांधकाम विभाग सर्व मंजुरी व कागदपत्रे पूर्ण करण्याच्या प्रक्रियेत असून, लवकरच प्रत्यक्ष पाडकाम सुरू होण्याची शक्यता आहे.

---

# पत्नी सोनमनेच दिली पतीच्या हत्येची सुपारी

## हनिमूनसाठी गेलेल्या नवदांपत्याच्या प्रकरणाला धक्कादायक वळण | सीबीआय चौकशीची मागणी

**इंदूर/शिलाँग, दि. ९ :**

हनिमूनसाठी मेघालयात गेलेल्या इंदूरमधील नवविवाहित दांपत्याच्या कथेला आता थरारक आणि दु:खद वळण मिळाले आहे. राजा रघुवंशी या २९ वर्षीय तरुणाचा मृतदेह मेघालयातील खोल दरीत सापडल्यानंतर पत्नी सोनम रघुवंशी बेपत्ता होती. मात्र, आता सोनमनेच पतीच्या खूनाची सुपारी दिल्याचे उघड झाले असून, तिने उत्तर प्रदेशातील गाझीपूर येथे पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं आहे.

मेघालय पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनमसह एकूण चार जणांना अटक करण्यात आली आहे. आणखी एक आरोपी अद्याप फरार असून त्याचा शोध सुरू आहे. मेघालयचे मुख्यमंत्री कॉनराड संगमा यांनी सोशल मीडियावरून या गुन्ह्याचा उलगडा सात दिवसांत झाल्याची माहिती दिली.

राजा आणि सोनम यांचे ११ मे रोजी लग्न झाले. त्यानंतर २० मे रोजी दोघे हनिमूनसाठी मेघालयात गेले. २३ मे रोजी ते बेपत्ता झाले. त्यानंतर २ जूनला, ईस्ट खासी हिल्स जिल्ह्यातील वेइसाडोंग धबधब्याजवळ १५० फूट खोल दरीत राजा यांचा कुजलेला मृतदेह सापडला. मृतदेहाची स्थिती अत्यंत भीषण होती. गळा कापलेला, अंगावरील दागिने आणि पाकीट गायब होते. या घटनेनंतर सोनम



गायब होती, पण आता तीच या खुनामागे असल्याचं उघड झालं आहे. पोलिसांनी हत्येसाठी वापरलेला 'धारदार दाओ' चाकूही जप्त केला आहे.

मेघालयचे पोलिस महासंचालक इदाशीशा नोंग्रांग यांनी सांगितले की, सोनमने गाझीपूर जिल्ह्यातील नंदगंज पोलिस ठाण्यात आत्मसमर्पण केले. छापेमारीदरम्यान इंदूर आणि उत्तर प्रदेशातून इतर तिघा आरोपींना अटक झाली आहे. या आरोपींना सोनमच्या सांगण्यावरूनच राजा याच्या हत्येची योजना आखल्याचे समजते आहे.

राजा व सोनम यांनी मेघालयात नोंग्रियाट गावात शिपारा '●होमस्टे'मध्ये मुक्काम केला होता. २३ मे रोजी त्यांनी तेथून चेक-आऊट केल्यानंतरच त्यांचा कुटुंबीयांशी संपर्क तुटला. सोनम आणि तिच्या सासू उमा यांच्यात झालेला तो शेवटचा कॉल होता. त्या वेळी सोनमने जंगलात जाण्याचा उल्लेख केला होता.

राजा यांचा मृतदेह ४ जून रोजी इंदूरमध्ये आणण्यात आला. त्यांच्या वडिलांनी भावनिक धक्का सहन न झाल्यामुळे स्वतःला सावरू शकले नाही, राजा यांचे मोठे भाऊ सचिन रघुवंशी यांनी या प्रकरणात अपहरण आणि सुनियोजित हत्येचा संशय व्यक्त करत सीबीआय चौकशीची मागणी केली आहे.

मेघालयचे मुख्यमंत्री संगमा यांनी या प्रकरणी पोलिस तपासाची स्तुती केली. केवळ सात दिवसांत आरोपींना गजाआड करण्यात आले असून, आणखी एक आरोपी लवकरच पकडला जाईल, असे त्यांनी सांगितले. ईस्ट खासी हिल्सचे पोलीस अधीक्षक विवेक स्येंम यांनी बीबीसी हिंदीला दिलेल्या माहितीनुसार, ही शंकेच्या पलीकडची हत्या आहे. गुन्ह्यात वापरलेलं शस्त्र जप्त करण्यात आलं असून पोस्टमॉर्टम अहवालाची

पान २ ▶